# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- २७६०/२०२१

अपिलार्थी, श्री.धनंजय लक्ष्मण शिंदे
शिंदे सदन, चौथा मजला, अहिल्याबाई चौक,
कल्याण (प.), जि.ठाणे ४२१ ३०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, कल्याण क्र.२, होली क्रॉस शाळेजवळ, दुर्वे बिल्डींग, चिकणघर, कल्याण (प), जि.ठाणे ४२१ ३०१.

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, ठाणे शहर, ४ था मजला, खोली क्र.४०६, जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, ठाणे (प), ४०० ६०१.

द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०८.०४.२०२४

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १४.०७.२०२१ | -- | १७.०८.२०२१ | -- |

अपिलार्थी यांनी दि. २२.१०.२०२१ रोजीच्या अर्जान्वये *" विहित मुदतीत कोणतीही माहिती न पुरविल्याने, विहित मुदतीत सुनावणी/निर्णय न दिल्याने "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०८.०४.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" सोबत जोडलेल्या, अर्जदार श्री.धनंजय लक्ष्माण शिंदे यांच्या दि.२४.१२.२०२० रोजीच्या (दोन माहिती अधिकार अर्जाचे अवलोकन व्हावे व पुढील मुद्यांची मुद्देनिहाय माहिती मिळावी.*

*१) सदर अर्जासंबंधीत नोंद असलेले, बी रजिस्टर व जावक रजिस्टर निरीक्षणासाठी मिळावेत व निरीक्षणपश्चात आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती मिळाव्यात.*

*२) सदर अर्जान्वये अर्जदारास दिलेले उत्तर स्पीड पोस्टाने पाठवल्याबाबत पोस्टाच्या पावतीची साक्षांकित प्रत मिळावी.*

*३) सदर अर्जान्वये माहिती पाठवल्याबाबतची पोस्टाच्या कनसाईनमेंट ट्रॅकिंग रिपोर्टची साक्षांकित प्रत मिळावी.*

*४) सदर अर्जान्वये दिलेले उत्तर अर्जदाराला मिळाल्याबाबत अर्जदाराची स्वाक्षरी असलेली पोचपावतीची साक्षांकित प्रत मिळावी.*

*५) सदर माहिती अधिकार अर्जावर करण्यात आलेल्या कारवाई व कार्यवाहीची संपूर्ण मुळ नस्तीची टिपणीसह सत्यप्रत मिळावी. "*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये *" माहिती प्राप्त झालेली नाही "*असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असे सांगितले की, त्यांनी माहिती अर्जान्वये मागीतलेली माहिती त्यांना मुदतीत प्राप्त झाली नाही. प्रथम अपिलयी प्राधिकारी यांनी आदेश दिलयानंतर दि.०३.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली आहे. तथापि सदर माहिती ही साक्षांकित करुन दिलेली नाही.

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना नोटीस प्राप्त होऊनदेखील ते सुनावणीस अनुपस्थित आहेत. तसेच त्यांनी त्यांचा लेखी अहवाल देखील आयोगासमोर सादर केले नाही. त्यामुळे त्यांना एक संधी देऊन, सदर सुनावणी पुन्हा घेण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य राहील. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.०६.०५.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०८ एप्रिल, २०२४ .

संगणक-11